# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०९/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक १३/०६/२०२२ चे १२.०० वा. ते दिनांक २४/०९/२०२२ चे ०९.०० वा. दरम्यान आरोपी नामे— राजकिरण गणेश गायगये, वय २९ वर्ष रा. चोरखुमारी याने फिर्यादी/पीडित वय ३२ वर्षे हिला 'तु माझेसोबत चल नाहीतर तुझ्या मुलाला मारीन' अशी धमकी देवुन तिला चांदपुर येथे घेवुन जावुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने फोटो काढले व ते फोटो गावातील लोकांना व तिचे नातेवाईकांना वायरल केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३२६, ५०६ भादंवी. सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान सुधारण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मकेश्वर मो.क्र. ९०४९९६५०१४ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा काटोल महाक्रेट सिमेंट पाईप कंपनीसमोर रोडवर येथे दिनांक १४/०९/२२ चे १८.३५ वा. सुमारास आरोपी नामे— अंकित सुरेंद्र मनकवडे वय २८ वर्ष रा नारसिंगी ता नरखेड हा आपले ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आला त्याच वेळी एक बैल रोड ओलांडत होता बैलाला बघून मोटरसासकल चालकाने ब्रेक मारले त्यामुळे त्याचे ताब्यातील मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने बैलाला कट लागून दोघेही मोटरसायकलसह खाली पडले. ज्यामुळे मोटरसायकल वरील डबलसिट बसलेल्या राजेंद्र पांडुरंग येवले(मृतक), वय ६८ वर्ष, रा. भारसिंगी यांचे डोक्याला जबर मार लागुन ते उपचारा दरम्यान मरण पावले. आरोपी हा मृतकाचे मरणास कारणीभुत असल्याने सदर मर्ग चौकशी अहवालावरून आरोपी विरूदध गुन्हा नोद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक अविनाश बहेकर पोस्टे काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि चव्हाण मो नं. ९०६७९६७१८१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर